महिला व बाल विकास विभागाच्या अधिनस्त श्रेत्रिय कार्यालयांतील गट-"ब" अराजपत्रित, गट"क", गट-"ड" वर्गीय पदे पदोन्नती /नामनिर्देशन /सरळसेवेच्या कोटयातून भरताना मौखिक परीक्षा न घेण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक:- मबाआ २०१७/ प्र.क्र.१८५ / कार्या-७

नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक :- ३० जानेवारी, २०१८

<u>वाचा:</u>- १) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक एबावि-२००५/प्र.क्र.४६/का-७ दिनांक ४ मार्च, २००५

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक प्रानिमं १२१४/ प्रक्र (४३/१४)/१३-अ दिनांक ०५ जून, २०१४

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक प्रानिमं १२१५/ प्रक्र (१०९/१४)/१३-अ दिनांक ०५ आक्टोंबर, २०१५

<u>प्रस्तावना:</u>-

संदर्भ क्र.(१) येथिल शासन निर्णय, महिला व बाल विकास, दि.४ मार्च, २००५ अन्वये एकात्मिक बाल विकास सेवा योजनांतर्गत "पर्यवेक्षिकांची" पदे भरण्याबाबत परिक्षापध्दती विहित करण्यात आली आहे.

संदर्भ क्र (२) येथिल शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ५ जून, २०१४ अन्वये, " भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळांच्या कक्षेतील निमनिर्देशनाच्या कोटयातील गट "क" वर्गीय आणि गट "ब" अराजपत्रित मधील कोणत्याही पदांकरीता उमेदवारांची निवड करतांना मौखिक परीक्षा (मुलाखती) घेण्यात येऊ नये" असे निर्देश देण्यात आले आहे.

संदर्भ क्र. (३) येथिल शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि. ०५ आक्टोंबर, २०१५ अन्वये गट-"ड" ची रिक्त पदे निमनिर्देशनाने भरताना अवलंबावयाची कार्यपध्दतीबाबत सूचना दिलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने महिला व बाल विकास विभागाच्या पर्यवेक्षिका (मुख्यसेविका) पदभरतीकरिता स्वंतत्र कार्यपध्दती विहिती केली असल्यामुळे सदर कार्यपध्दतीमध्ये सामान्य प्रशासन विभागाच्या

शासन निर्णयांतील तरतुदींनुसार आवश्यक त्या सुधारणा करणे क्रमप्राप्त आहे. तसेच महिला व बाल विकास विभागाच्या अधिनस्त श्रेत्रिय कार्यालयांतील गट-"ब" अराजपत्रित, गट-" क", गट-"ड" वर्गीय पदे पदोन्नती / नामनिर्देशनाच्या कोटयातून भरताना मौखिक परीक्षा न घेण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

शासन निर्णय :-

महिला व बाल विकास विभागाच्या अधिनस्त श्रेत्रिय कार्यालयातील गट-"ब " अराजपत्रित, गट "क", गट-"ड" वर्गीय पदे पदोन्नती/नामनिर्देशन /सरळसेवेच्या कोटयातून भरताना उमेदवारांची मौखिक परिक्षा न घेता केवळ लेखी परिक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवडसूची तयार करून निवडसूचीतील पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करण्यात यावी.

२. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दिनांक ५ जून, २०१४ अन्वये यापुढे गट-"ब" अराजपत्रित, गट "क" या पदासांठी फक्त लेखी परीक्षा घेऊन निवड करावयाची आहे व अशा पदांसाठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नाकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवून २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात यावी. वरिल परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाची असतील. प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास अधिकाधिक २ गुण ठेवण्यात येतील.

३. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दिनांक ५ आक्टोंबर, २०१५ अन्वये गट-"ड" ची पदे निमनिर्देशनाने भरतांना १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात यावी. लेखी परीक्षेसाठी वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरूपाचे ५० प्रश्न असावेत. सदर प्रश्न संबंधित पदाकरीता विहित करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेच्या स्तरावरील असावेत. सदर लेखी परिक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवडसूची तयार करून निवडसूचीतील पात्र उमेदवारांची निवड करण्यात यावी.

४. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेत नसलेली गट-"ब" (अराजपत्रित), गट-"क", गट-"ड" चीपदे पदोन्नती / नामनिर्देशन / सरळसेवेने भरताना मौखिक परिक्षा (मुलाखत) न घेण्याबाबतचा निर्णय महिला व बाल विकास विभागाच्या अधिनस्त सर्व श्रेत्रिय कार्यालयाना लागू होतील.

५. महिला व बाल विकास विभागाच्या अधिनस्त सर्व श्रेत्रिय कार्यालयानी वरिल सूचनाचे काटेकोर पालन करावे. त्याचप्रमाणे, सदरहु या निदेशांचे त्यांच्याकडून कोटेकारे पालन केले जात आहे यावर संनियंत्रण आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, आयुक्तालय, पुणे यांनी ठेवावे. तसेच **यापुर्वीचे पदोन्नती / नामनिर्देशन / सरळसेवेने भरताना मौखिक परिक्षा घेण्याबाबतचे महिला व बाल विकास विभागाचे सर्व शासन निर्णय निरस्त करण्यात येत आहे.** यापुढे गट-"ब" (अराजपत्रित), गट-"क" व गट-"ड" ची पदभरती करतांना सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी विहित केलेल्या कार्यपध्दतीची अंमलबजावणी करण्यात यावी, हे आदेश तात्काळ अमंलात येतील.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०११९१७०९३४९२३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2018.02.05 12:59:49 +05'30'

(ला.रा.गुजर)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री, महिला व बाल विकास विभाग,यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई .
२. मा.राज्यमंत्री, महिला व बाल विकास विभाग, यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई.
३. सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. महालेखापाल,महाराष्ट्र राज्य (सेवा/अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा) मुंबई/ नागपूर
५. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई
६. आयुक्त,महिला व बाल विकास, पुणे.
७. सर्व जिल्हाधिकारी
८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
९. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
१०.सर्व समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
११.सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी
१२.सचिव, महिला व बाल विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक
१३.सर्व उपसचिव / अवर सचिव /कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास
१४.निवड नस्ती (कार्यासन-७)